## पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, मुंबई.

दि. १४/०३/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे जानेवारी –२०१९ या महिन्याचा " **BEST CONVICTION OF THE MONTH** " चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी – २०१९

| बांद्रा पो. ठाणे परिमंडळ–०९ | गु.र.क्र. ६१/२०१३, कलम ३०२, १२०ब ,३४ भा.दं.वि.सं. |
|---|---|

–: खून :–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–**

दिनांक ०४/०२/२०१३ रोजी ००:३०वा. रोजी मुख्य नियंत्रण कक्ष मुंबई येथून संदेश प्राप्त झाला की, वांद्रे वरळी सिलींक रोड यु ब्रिज खाली बांद्रा प. मुंबई ५० या ठिकाणी एका टाटा इंडीको कार मध्ये काहीतरी गडबड चालू आहे. असा संदेश प्राप्त झाल्याने तात्काळ घटनास्थळास ठाणे अंमलदार तत्कालीन पोलीस उप निरीक्षक कोले यांनी भेट दिली. त्यावेळी घटनास्थळावरील उपस्थीत पोलीसांकडून समजले की, सदर इंडोको कारचा चालक यांनी अशी माहीती पोलीसांना दिली आहे की, सदर इंडीको कार मध्ये चालक व त्याची पत्नी तसेच दोन बालक वय एकाचे ३ वर्षे व एकाचे वय ९ महीने असे प्रवास करीत असताना अनोळखी ३ पुरुष मोटर सायकल स्वाराने जबरी चोरी करण्याचे उददेशाने त्यांची मोटर कार अढवून त्यांना जबर मारहाण करुन कापडी पटटयाने इंडीको कारचे पुढील ड्रायव्हर शीट व त्या शेजारील शिटला बांधून मोबाईल फोन व पैसे जबरीने घेवून गेले अशी हकिगत सांगून यातील जखमीना भाभा रुग्णालयात घेवून गेले असल्याचे सांगीतले.

सदरचा मालमत्तेविषयी गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्याने सदर बीट मध्ये कर्तव्यास असणारे तत्कालीन पोलीस उप निरीक्षक महेंद्र दोरकर यांना ठाणे अमंलदार कोले यांनी माहीती देवून मदती करीता भाभा हॉस्पीटल बांद्रा येथे बोलविले. भाभा हॉस्पिटल मध्ये सदर घटनेतील जखमी इसमांबाबत डॉक्टराकडे चौकशी केली असता हॉस्पीटल प्रशासन यांचे कडून माहीती मिळाली की, मयत माहीला नामे अयशा सलमान शेख वय २१ वर्षे ही रुग्णालयात दाखल पूर्व मयत झाली असून तीचा मृत्यू गळादाबून झाला असला असल्याचे सांगीतले. तसेच सदर घटनेतील चालक नामे सलमान अयुब शेख वय २८ वर्षे यास उपचारासाठी दाखल करत असल्याचे सांगीतले व सदर घटनेत त्यास कोणतीही जखम झाली नाही तसेच सदर घटनेतील दोन्ही लहान मुलांना सुध्दा जखम झालेली नाही अशी माहीती मिळाली. त्या प्रमाणे नमुद घटनेतील चालक नामे सलमान अयुब शेख वय २८ वर्षे याचे कडे चौकशी केली असता त्याने ही वरील प्रमाणेच त्याची पत्नी व त्यास मारहान करुन तीन अनोळखी मोटर सायकल स्वाराने जबरी चोरी करुन मोबाईल व रोख रक्कम घेवून त्या दोघांना गाडी मध्ये बांधून मोटर सायकलवरुन निघून गेले असल्याचे सांगीतले.

तेथे उपस्थीत फिर्यादी यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की, त्याचा वापरता मोबाईल वर अनोळखी नंबर वरुन अनोळखी इसमाने फोन करुन त्यांचे मुलीचा वरळी सिलींक येथे शॉट झाला आहे तेथे जावून बगा असा फोन आला होता असे सांगीतले. सदर

एकदरीत प्राथमीक चौकशी वरुन व घटनास्थळाची दिसती परीस्थीती पाहून यातील जखमी इसम सलमान अयुब शेख वय २८ वर्षे हा खोटी हकीगत सांगुन पोलीसांची दिशाभूल करीत असल्याचे निदर्शनास आले. सदर गुन्हयातील फिर्यादी यांचे कडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की त्यांचा जावई आरोपी क्र. १ सलमान अयुब शेख वय २८ वर्षे याचे व महीला नामे जास्मीन हीचेशी प्रेमसंबंध ठेवून मयत महीलेस माहीती न होता लग्न केले होते. त्यांचे लग्नास मयत महीलेची अडचण होत असल्याने मयत महीलेकडून आरोपी क्र. १ यास सोडपत्र पाहीजे होते. तात्काळ तीने त्याला सोडपत्र दयावे म्हणून आरोपी क्र. १ हा तीला वारोंवार जाच हाट करीत असल्याचे फिर्यादी यांनी सांगून आरोपी क्र. १ व त्याचे अनोळखी दोन मित्रानी अन्यायाचा कट रचून त्यांनी त्याचे मयत मुलगी अयशा हीचा गळा दाबून खून केला असल्याची दिलेल्या तक्रारी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात मयत महलीचा मृतदेहाचा सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे इन्कवेस्ट पंचनामा करण्यात आला. तसेच नमुद गुन्हयाचे घटनास्थळी डॉग स्कॉड इनवेस्टीगेशन व्हॅन यांना पाचारण करुन सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. पंचनामा दरम्यान गुन्हयाचे अनुशंगाने महत्वाचे भौतीक पुरावे मिळतील अशा वस्तू जप्त करण्यात आल्या. सदर गुन्हयातील संशयीत आरोपी यांचे कडे तत्कालीन पोलीस उप निरीक्षक श्रीशैल्य कोले व महेंद्र दोरकर यांनी कसून चौकशी केली असता त्यांनी तपासास प्रतीसाद न देता उडवाउडवीची उत्तरे देवून गुन्हयाशी त्यांचा काहीएक संबध नसल्याचे सांगीतले.

पो.उ.नि. महेंद्र दोरकर यांनी मयत महीला व आरोपी क्रमांक १ यांचा घटनास्थळी हजर असलेला मुलगा नामे फरहान वय ३ वर्षे याच्याकडे नमुद गुन्हयातील पाहीजे असलेल्या आरोपीता बाबत कौषल्यपूर्वक विचारपूस करुन पाहीजे आरोपीताचे नावे निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणला. सदर गुन्हयातील ३ आरोपीतास तपासी अधिकारी पो.उ.नि. कोले यांनी अटक केली व आरोपीतानी गुन्हयात वापरलेले मोबाईल मोटार कार इत्यादी वस्तू जप्त केल्या.

सदरचा गुन्हा हा सत्र न्यायालयात चालणारा असल्याने त्या नंतर सदर गुन्हयाचा तपास पोलिस निरीक्षक उत्तम सावंत यांना वर्ग करण्यात आला. त्यांनी तपासा दरम्यान आरोपी चे मोबाईल सी.डी.आर. व नुडल ऑफिसरचे अभिप्राय हस्तगत केले. त्या नंतर सदर गुन्हयातील आरोपी क्र. ४ हीस अटक केले गुन्हयाचा तपास पूर्ण करुन आरोपीता विरुध्द सबळ पुरावे मिळवून त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र एस.सी. नंबर ४४९/१३ प्रमाणे सादर केले. सदर आरोपी क्र. ४ हीस मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी गुन्हयातून सी.आर.पी.सी. १६९ प्रमाणे गुन्हयातून मुक्त केले.

मा. ५६ वे सत्र न्यायालय मुंबई येथे सदर खटल्याची सुनावणी झाली सदर अटक आरोपी विरुध्द सरकार तर्फे एकूण २३ साक्षिदार तपासण्यात आले. साक्षिदार यांना मा. न्यायालयात साक्षी कामी वेळोवेळी वेळेत हजर ठेवण्यात आले. सदर सवेदनशिल गुन्हयातील साक्षिदार यांचा वेळोवेळी पाठपूरावा घेण्यात आल्याने मा. न्यायालयात सरकार तर्फे भक्कम बाजू मांडण्यात आल्याने आरोपी क्र १ यांस खाली नमुद केल्याप्रमाणे जन्मठेपेची शिक्षा व इतर आरोपीताना गुन्हयातून निर्दोष मुक्त केले आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. अब्दूल रज्जाक अब्दूल सत्तार काडगावंकर वय ४७ वर्षे |
| **बळीत/मयत** | :— | श्रीमती आयशा सलमान शेख वय २१ वर्षे<br>( आरोपी क्र १ सलमान शेखची पत्नी ) |

| | | |
|---|---|---|
| आरोपी अटक | :— | १) सलमान अयुब शेख वय २८ वर्षे<br>२) मो.सादीक मो.रफिक खान वय २०वर्षे (आरोपी क्र १ चा मित्र )<br>३) मो.साकीर उर्फ ईला गुलाम हुसेन शेख वय २० वर्षे (आरोपी क्र १ चा मित्र )<br>४) श्रीमती जास्मीन आयुब शेख वय २४ वर्षे (आरोपी क्र १ ची प्रेयसी) |
| निकाल दिनांक | :— | १८/०१/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | १) खुनाच्या गुन्हयात कलम ३०२ खाली दोषी धरुन आरोपी क्र. १ सलमान शेख यांस जन्मठेप कारावास व २,००,०००/— रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.<br>२) आरोपी क्र. १ कडुन घेण्यात आलेला दंड त्याची मुले फरहान सलमान शेख व फर्जान सलमान शेख यांना प्रत्येकी रु. १,०००००/— देण्यांत यावे. सदरची रक्कम राष्ट्रीकृत बॅकेत सदरची मुले सज्ञान होई पर्यत फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवण्यात यावी. |

तपास कौशल्य :—

१) आरोपीविरुध्द तपास करून विहित वेळेत दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले.

२) गुन्हा दाखल करुन गुन्हयाचा इनक्वेस्ट पंचनामा घटनास्थळ पंचनामा अटक आरोपीताकडून गुन्हयातील मोबाईल फोन तसेच तांत्रीक भौतीक दुवे हस्तगत केले.

३) गुन्हयाचे तपासात मदत गुन्हयातील बाल साक्षिदार वय ३ वर्षे याचे कडे कौषल्यपूर्व विचारपूस करुन पाहीजे दोन आरोपीतांची नावे निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणला व साक्षिदार वेळोवेळी न्यायालयात हजर करुन पाठपूरावा केला.

४) न्यायालयीन सुनावणीच्या वेळी सरकारी पक्षातर्फे बाजू मांडणेकरीता साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करून आरोपीत विरूद्धचे पुरावे उत्कृष्टरित्या सादर केले.

५) न्यायालयीन सुनावणीच्या वेळी सरकारी पक्षातर्फे बाजू मांडणेकरीता साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करून आरोपीत विरूद्धचे पुरावे उत्कृष्टरित्या सादर केले.

६) यातील आरोपी क्र १ ने जबरी चोरी केल्याचा बनाव करुन पोलीसांना प्रथम खोटी माहिति देवुन दिशाभुल केली होती त्यामुळे सदरचा गुन्हा दोषसिध्द करणे अवघड बाब होती.

७) सदरच्या गुन्हयांत तरुण स्त्रीचा खुन सि लिंकच्या खाली झाला असल्याने त्याबाबत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाने सदरच्या घटनेस उचलुन घरुन त्याबाबत इंग्रजी वृत्तपत्र डि एन ए,टाइम सिटी, हिंदुस्थान टाईम्स, मुंबई मिरर, मिड डे, मराठी वृत्तपत्र सकाळ, पुण्यानगरी, प्रहार, नवाकाळ, वृत्तमानस, सामना, उर्द वृत्तपत्र रोजनामा राष्ट्रीय सहारा, द इक्लाब या वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या. त्यामुळे सदरचा गुन्हा उघड करुन आरोपींना दोषसिध्द करणे पोलीसांना आव्हान होते.

८) यातील आरोपीस जन्मठेपेची शिक्षा झाल्याबाबत इंग्रजी वृत्तपत्र टाइम सिटी, मुंबई मिरर या वृत्तपत्रांनी प्रशंसा केली आहे.

सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने व सदर गुन्हयातील अटक आरोपी नामे १) सलमान अयुब शेख वय २८ वर्षे यास सत्र न्यायालयाने **१) खुनाच्या गुन्हयात कलम ३०२ खाली दोषी धरुन आरोपी क्र. १ सलमान शेख यांस जन्मठेप कारावास व २,००,०००/— रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

२)  आरोपी क्र. १ कडुन घेण्यात आलेला दंड त्याची मुले फरहान सलमान शेख व फर्जान सलमान शेख यांना प्रत्येकी रु. १,०००००/— देण्यांत यावे. सदरची रक्कम राष्ट्रीकृत बॅकेत सदरची मुले सज्ञान होई पर्यत फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवण्यात यावी.अशी शिक्षा दिली आहे.

मा. पोलीस आयुक्तांनी माहे जानेवारी—२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कुष्ठ गुन्हे दोषसिध्दी या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|
| 1 | पोलिस निरीक्षक/ उत्तम सावंत ( सेवानिवृत्त ) |
| 2 | सहा. पोलिस निरीक्षक /श्रीशैल्य महादेव कोले |
| 3 | सहा.पोलीस निरीक्षक /महेंद्र दादासाहेब दोरकर |
| 4 | पोलीस हवालदार क्र. १७८७/ संतोष सिताराम घाडीगावकर |
| 5 | पोलीस हवालदार क्र. २८७८/ भरत दशरथ बावलेकर |